S. M. B. T. Sevabhavi Trust Amrutnagar Inward No. 33 Dt. 18/06/2006

आवक क्र. 13 दि. 19/6/2006

शैक्षणिक वर्ष २००६-०७ करीता औषधनिर्माणशास्त्राचा पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नविन संस्थांना मान्यता देण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४ मे २००६

S. M. B. T. College of Pharmacy, Nandi-Hills, Dhamangaon, Tal. Igatpuri Inward No. ........ Dt. / /200

**संदर्भ :-** १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र मान्यता २००५/(६३९/०५)/तांशि-६, दि. १५ मार्च, २००५.
४.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००५/ (७०३/०५)/ तांशि-६, दि.१ एप्रिल २००६

**शासन निर्णय** :- सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार यासाठी उपरोक्त संदर्भ-३ नुसार राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी शासनाच्या संदर्भ- ४ मधील पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन मान्यता दिलेल्या संस्थांना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ ते ५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी निम्न अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्षे कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवीची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.

- सदर संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात फार्मसी ॲक्ट १९४८च्या कलम-१२ मधिल तरतूदीनुसार फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधन कारक राहील.

३. वरील व अन्य औपचारिक बाबी संबंधी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संबंधित संस्थांशी आवश्यक करारनामा करुन सदर संस्थांनी आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थात ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पुर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी व त्या नंतर सदर संस्थात प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी व तद्नुषंगाने संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. बा. तुंबारे

(सु.बा.तुंबारे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई
४. संबंधीत संस्था

**प्रत माहितीसाठी**

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेस, आय.पी. इस्टेट, नवी दिल्ली - ११० ००२.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई -२०.
३. निवड नस्ती / तांशि -६

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | Sau Mathurabai Bhausaheb Thorat Seva bhavi Trust, Amrutnagar, Ghulewadi Sangamner, Dist. Ahmednagar | S.N.B.T. Institute of Diploma Pharmacy, Igatpuri, Dist. Nashik | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2471/2006, 2nd May, 2006. |
| 15 | Sangamner Medical Foundation & Research Institute Sangamner, Dist. Ahmednagar- | Vamanrao Ithape Pharmacy College, Velhale, Sangamner, Dist. Ahmednagar | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2472/2006, 2nd May, 2006. |
| 16 | Sanjay Education Society's Navalnagar, Dist. Dhule | Sanjay Education Society's Diploma in Pharmacy Balapur, Dist.Dhule | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2473/2006, 2nd May, 2006. |
| 17 | Swami Vivekanand Sanstha, 1042 Punam Complex, Ravalgaon Naka, Malegaon, Dist. Nashik | Swami Vivekanand Sanstha's Institute of Pharmacy, A/P Mungase, Malegaon, Dist. Nashik | 60 | 2 Yrs | 10 +2 | 2006-07 | F-22-2474/2006, 2nd May, 2006. |